महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सावित्रीबाई फुले विद्यापीठ रस्ता, शिवाजी नगर, पुणे-४११०१६

संकेतस्थळ:-www.gppuine.ac.in ई-मेल:-gpphostel@gmail.com

---

जा.क्र.शातनिपु/वसती/२०२१/४५९ दि.२८/०१/२०२१

## प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

## मुलांचे व मुलींचे वसतीगृह प्रवेश नियमावली (शै. वर्ष २०२० - २१)

कोविड -१९ च्या पार्श्वभुमीवर शै. वर्ष २०२०-२१ साठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया खालील प्रमाणे राबविण्यात येणार आहे. सद्यपरिस्थितीत वसतिगृह प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज भरून घेऊन सर्वसाधारण अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून शासनाच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेनंतर वसतिगृहात उपलब्ध जागेनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

## वसतीगृह प्रवेश (मुलांचे व मुलींचे)

**नियमावली:-**

१) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश अर्ज भरणेसाठी वेगवेगळी गुगल लिंक दिलेली आहे.

२) गुगल फॉर्ममध्ये अचूक व सत्य (खरी) माहिती भरावयाची आहे. खोटी माहिती सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

३) वसतीगृह प्रवेश निश्चित झालेनंतर विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्रे तपासून व वसतीगृह शुल्क भरले नंतर राहण्यास परवानगी दिली जाईल.

४) वसतीगृह शुल्क वार्षिक अ) खुला गट - १०५०/- रु. ब) राखीव गट- ५५०/- रु.

५) वसतीगृह प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांनी Antiragging व वसतीगृहाचे नियम मान्य असल्याचे शपथपत्र तसेच कोवीड-१९ संदर्भात पालकाचे व विद्यार्थ्यांचे सहमतीपत्र, स्वाक्षरी करून प्रत्यक्ष प्रवेश झालेवर वसतीगृह विभगात जमा करणे बंधनकारक राहील.

६) **थेट द्वितीय वर्ष** प्रवेशित विद्यार्थी वसतीगृह प्रवेशासाठी पात्र नाहीत, त्यांनी प्रवेश अर्ज भरू नये.

७) द्वितीय व तृतीय वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे **विषय राहिलेले आहेत (एक विषय देखील राहिलेला असेल तरी )** ते विद्यार्थी वसतीगृह प्रवेशासाठी पात्र नाहीत, त्यांनी प्रवेश अर्ज भरू नये.

८) द्वितीय व तृतीय वर्ष वसतीगृह प्रवेशासाठी **मागील लगतच्या फक्त दोन सत्राचे गुण** ग्राहय धरले जातील.

९) एखादा विद्यार्थी विषम सत्रामध्ये कोणत्याही विषयामध्ये नापास झाला असेल व त्याने तो विषय पुढील समसत्रात सोडविला असेल तर विषम सत्रातील त्या विषयाचे गुण व एकूण गुण वजा करून विषम सत्राचे सुधारित गुण गुगल फॉर्म मध्ये भरावेत.

**उदाहरणार्थ** - '**अ**' हा विद्यार्थी इंजीनिअरींग ग्राफिक्स या विषयात विषम सत्रात नापास झाला आहे व त्याला सर्व विषयाचे मिळून एकूण ७५० पैकी ६४८ गुण प्राप्त झाले आहेत. तर त्याने एकूण गुणामधून व प्राप्त गुणामधून इंजीनिअरींग ग्राफिक्स या विषयाचे सर्व गुण (चाचणी परीक्षा, प्रोग्रेसिव्ह असेसमेंट, थेअरी व प्रॅक्टिकल ) वजा करावेत.

जसे इंजीनिअरींग ग्राफिक्स या विषयात प्राप्त गुण -

(Test- १३/२०, PA- २१/२५, PR- २०/२५, ESE - ३०/८०) मिळालेले गुण - ८४/१५०.

आता अ हा विद्यार्थी नापास असल्यामुळे मिळालेले गुण - ६४८ - ८४ = ५६४

एकूण गुण - ७५० – १५० = ६००

वरील प्रमाणे **अ** हा विद्यार्थी गुगल फॉर्म मध्ये विषम सत्राचे ५६४/६०० गुण भरेल.

१०) प्रवेश अर्ज भरणेसाठी गुगल लिंक -

१) प्रथम वर्ष :- https://forms.gle/RDx7cMaR1WnJDaHA8

२) द्वितीय वर्ष :- https://forms.gle/qtXNGBPw1gbXGTxW9

३) तृतीय वर्ष :- https://forms.gle/2a38u3WSoxnbAejk9

११) उपरोक्त लिंकवर क्लिक केले नंतर प्रवेश अर्ज उपलब्ध होईल, ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश हवा आहे फक्त त्या विद्यार्थ्यांनीच हा फॉर्म भरावयाचा आहे, इतर विद्यार्थ्यांनी हा अर्ज भरू नये.

**<u>प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक</u>**

| कार्यवाही तपशील | कालावधी |
|---|---|
| १) विद्यार्थ्यानी गुगल फॉर्म भरणे | दि. २९/०१/२०२१ ते ०४/०२/२०२१ |
| २) सर्वसाधारण अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे (संस्थेच्या संकेतस्थळावर- www.gppune.ac.in ) | दि. ०७/०२/२०२१ |
| ३) उपलब्ध जागेनुसार वसतीगृह प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याची यादी प्रसिध्द करणे (संस्थेच्या संकेतस्थळावर- www.gppune.ac.in ) यादी प्रसिद्ध केली जाईल. | शासनाकडून वसतीगृह सुरु करण्याचे आदेश प्राप्त झालेनंतर ७ दिवसात |

स्वाक्षरीत/-
(डॉ. विठ्ठल श्री. बांदल )
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.

प्रत:- १. सर्व विभाग प्रमुख यांना प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष विद्यार्थ्याच्या Whatsapp Group वर पाठविणेसाठी.
२. विभाग प्रमुख संगणक यांना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिद्धीसाठी.